# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे मुलींच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे धोरण

**डॉ. सुनीता संतोष खडसे,** प्रोफेसर व विभागप्रमुख इतिहास विभाग श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली

---

**प्रस्तावना :**

महाराज सयाजीराव गायकवाडयांच्या समग्र शैक्षणिक धोरणाचा आणि सर्वांगीण शैक्षणिक सुधारणांचा अविभाज्य घटक म्हणजे 'स्त्री शिक्षण' हा होता. सुशिक्षित स्त्रिया या राष्ट्र उभारणीतील आणि विकासातील अनिवार्य भाग आहेत यामुळे स्त्रियांच्या शिक्षणावर महाराजांचा जास्तीत जास्त भर होता. महाराज म्हणत असत की, ''स्त्रियांना शिक्षणाचा लाभ न दिल्याने आपण आपल्या राष्ट्राची अर्धी संधी गमावीत आहोत. आपल्या मुलांना सुशिक्षित मातांचा लाभ देण्यास नाकारीत आहोत आणि मातांच्या मानसिक शक्तीची वाढ खच्ची करून भावी पिढ्यांचे भयंकर नुकसान करीत आहोत. इतकेच नव्हे तर यामुळे आपल्या घरात दुही माजविण्यास मदत करत असून जुने तेवढे उराशी बाळगून बसणारा असा एक अजिबात निराळा वर्ग तयार करीत आहोत.''[१]भारतातील अगणित सामाजिक समस्यांच्या मुळाशी अज्ञान आणि निरक्षरता हेच कारण आहे असा महाराजांचा ठाम विश्वास होता. त्यामुळेच कोणत्याही प्रकारच्या समाज सुधारणा करावयाच्या असतील तर प्रथम शैक्षणिक सुधारणा आवश्यक आहेत असा महाराजांचा आग्रह होता. ''हिंदुस्थानाला शिक्षण ही गोष्ट सर्वतोपरी महत्त्वाची आहे. हत्ती एवढ्या दगडांना ज्याप्रमाणे लोखंडाची तरफ हलवून बाजूला करू शकते. त्याप्रमाणे असंख्य युगांपासून त्या दगडासारखाच निश्चल पडून राहिलेल्या या अफाट देशाला हलवू शकणारी, चेतना देऊ शकणारी शिक्षण ही एक तफरच आहे. या कामी योग्य अशी ती एकटीच तरफ आहे - देशाची एकमेव उद्धारकर्ती आहे म्हणून शिक्षणाचा मन:पूर्वक पुरस्कार करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते.''[२]

शिक्षणाचे महत्त्व ओळखून सक्तीच्या प्राथमिक मोफत शिक्षणाची कायदेशीर अंमलबजावणी करण्याचा भारतातील पहिला बहुमान महाराज सयाजीराव गायकवाड यांना आणि त्यांच्या बडोदा राज्याला जातो. भारतीय शिक्षण क्षेत्रात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे ही संकल्पना जागतिक परिप्रेक्ष्यात तुलनात्मकदृष्ट्या तशी नवीन होती . विल्यम अँडम हे ख्रिश्चन मिशनरी इ.स. १८१८मध्ये भारतात आले होते. भारतात सक्तीचे शिक्षण देण्याची योजना त्यांनी मांडली; परंतु त्यांच्या योजनेला ब्रिटिश सरकारने योग्य तो प्रतिसाद दिला नाही. मुंबई इलाख्याचे महसूल सर्वेक्षण आयुक्त कॅप्टन विनगेट यांनी १८८२ मध्ये ही संकल्पना मांडली. गुजरात विभागाचे शिक्षण निरीक्षक टी. सी. होप यांनी गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याची शिफारस केली. मात्र ब्रिटिश सरकारकडून याबाबत कोणतीही कारवाई केली गेली नाही. या शिफारसींपासून प्रेरणा घेऊन भारतीय नेत्यांनी त्यांच्या लढ्यामध्ये शैक्षणिक बाबींचा अंतर्भाव केला. सार्वत्रिक शिक्षणाची प्रथम मागणी करणारे दादाभाई नौरोजी हे नेते होते. १८८२ मध्ये त्यांनी ही कल्पना भारतीय शिक्षण आयोगापुढे मांडली. इंग्लंडमध्ये १८७९साली सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक संमत झाल्यावर भारतातही या मागणीने जोर धरला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याबाबत भारतीय शिक्षण आयोगाकडून लोकांच्या फार मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र या आयोगाच्या अहवालात त्याचा कुठेही उल्लेख करण्यात आला नाही.[३]

ब्रिटिश सरकारची सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबतची उदासिनता, एक राज्यकर्ता म्हणून महाराजांना खटकल्याशिवाय नक्कीच राहिली नाही. सन १८८१मध्ये महाराजांनी बडोद्याच्या राज्य कारभाराची प्रत्यक्ष सूत्रे हाती घेतली आणि त्यानंतर त्यांनी सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची सुरुवात बडोदा राजयात करण्याचा ठाम निश्चय केला. भारतात सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची सुरुवात करण्याचा आणि त्यासंबंधी कायदा करण्याचा पहिला बहुमान महाराज सयाजीराव गायकवाड यांनाच जातो. शिक्षणाच्या सक्तीचा कायदा करताना महाराजांना त्यासंबंधी अनेकविध बाबींचा सांगोपांग विचार करावा लागला. प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीच्या कायद्याअंतर्गत शिक्षणाचे प्रारंभीचे व अंतिम वय काय असावे? मुलामुलींच्या वयाचा किती वर्षांचा कालखंड सक्तीच्या वयात अंतर्भूत करावा? मुलामुलींची खानेसुमारी व नोंदणी कशा पद्धतीने करावी? मुलामुलींना शाळेत पाठविण्याबाबत पालकांवर कोणकोणत्या स्वरूपाचे निर्बंध घालावेत? प्राथमिक शिक्षण सक्तीच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालकांना कोणत्या प्रकारच्या शिक्षा किंवा दंड कराव्यात? इमारतीचा, शिक्षकांच्या वेतनाचा व प्रशिक्षणाचा खर्च कशा पद्धतीने भागविला जावा? शिक्षण मोफत द्यावे की काही शुल्क आकारावे? मुलामुलींनी शाळेत यावे म्हणून त्यांना मोफत पुस्तके, खेळाचे साहित्य,

वाहन, औषधपाणी, फराळ, दूध, कपडे इत्यादी प्रकारच्या सुविधा कशा रीतीने द्याव्यात? या योजनेला लागणारा प्रचंड निधी कसा उभारावा? जास्तीत जास्त मुलामुलींना या कायद्याअंतर्गत शिक्षणाचा लाभ देण्यासाठी काय काय करावे? अशा अनेक प्रश्नांचा सखोल विचार करून महाराजांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर बडोदा राजयाच्या अमरेली विभागात राबविण्याचा निर्णय घेतला.

त्यासंबंधी बडोद्याचे दिवाण मणीभाई यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात की, ''आपल्या संपूर्ण संस्थानासाठी नाही; परंतु काही भागांमध्ये सक्तीची शिक्षण योजना लागू करण्याबाबत मी फार दिवसांपासून विचार करीत आहे. अनेक अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका झाल्यानंतर काल माझ्या हाती काही आवश्यक माहिती मिळाल्यामुळे मला फार आनंद झाला आहे. मिळालेली माहिती बरोबर आहे आणि त्याविषयीची मते ताठर नसून उदार आहेत हे गृहीत धरून मी एक हुकूम काढत आहे. ज्याची अंमलबजावणी अत्यंत जबाबदारीने व्हायला हवी आणि त्यातील प्रत्येक बाबीकडे पूर्ण लक्ष द्यायला हवे. योजना कार्यान्वित असताना जे दोष आढळतील त्यावर विचार विनिमय करून उपाय करावेत. खर्चाच्या अंदाजपत्रकातील त्रुटी दूर कराव्यात. आपण नुसते उत्साही, क्रियाशून्य किंवा हौशी असून चालणार नाही. चुकांची दुरुस्ती व्हावी अशी आमची तळमळीची इच्छा आहे. मोठा खर्च करण्याची क्षमता आपल्या संस्थानाची आहे का हा गंभीर प्रश्न आहे. आपल्या उत्पन्नाएवढा खर्च तर आपण करून बसलो आहोत आणि ही बाब समाधानाची नाही. खर्चविषयक गंभीर जबाबदारी अंगावर ओढवून न घेता आपण काही हजार रुपये खर्च करू शकतो हे लक्षात घेऊन मी असा आदेश काढतो की, अमरेली महालातील सर्व खेड्यांमध्ये शाळा सुरू केल्या जाव्यात. हरगोविंददास द्वारकादास यांनी या योजनेसाठी ३१७९०-८-० रुपयांचा खर्च होईल असे अंदाजपत्रक मांडले आहे. या हिशेबास साधारणत: मान्यता देण्यात आली आहे. मी साधारणत: असे म्हणत आहे, कारण सरकारच्या पूर्वमंजुरीशिवाय शिष्यवृत्ती देता येणार नाही किंवा देण्याविषयीचे आश्वासनही देता येणार नाही. त्या मदतीशिवाय लोकांनी शिक्षण घेणे मला उचित वाटते. सक्तीची शिक्षण योजना सुरू करण्यापूर्वी महत्त्वाची पहिली अट अशी आहे की, प्रत्येक विभागाला शैक्षणिक साहित्य पुरविले जावे. ते पुरविल्यानंतर जर लोकांनी प्रतिसाद दिला नाही तर त्यांना काही शिक्षा लागू करण्याविषयी आपण विचार करू शकतो. माझा असा विश्वास आहे की, सर्व प्रजा जरी यासाठी तयार नसली तरी मोठ्या प्रमाणात त्यांच्या मुलांना स्वयंस्फूर्तीने शाळेत पाठवतील, जेणेकरून कायद्याची आवश्यकता थोडी सौम्य होईल.या योजनेमध्ये प्रत्येक जाती-जमातीच्या मुला-मुलींना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. एक मुद्दा मात्र संचालकांनी लक्षात घ्यावा, असे मला वाटते. तो असा की, हा महत्त्वपूर्ण हुकूम अमलात आणत असताना गोषा पद्धतीत असणारे लोक त्यांच्या मुलींना शाळेत पाठविण्याविषयी हरकत घेतात का याकडे लक्ष असू द्यावे. त्यांनी त्यांच्या मुलींना सरकारी शाळेतच पाठविणे आवश्यक नाही, मात्र सरकारने वेळोवेळी ठरवून दिल्यानुसार विशिष्ट इयत्तापर्यंतचे शिक्षण त्यांनी त्यांच्या मुलींना द्यायला हवे इतके मात्र अपेक्षित आहे.सक्तीच्या शिक्षण योजनेच्या या पहिल्या टप्प्याचे विस्तारीकरण भविष्यात पुढे कसे होईल हे राज्याकडे असणाऱ्या साधनसामग्रीवर सर्वस्वी अवलंबून असेल. संपूर्ण राज्याला शैक्षणिक सुविधा पुरविण्याचा खर्च अंदाजे बारा ते पंधरा लाख इतका असेल. मी स्वत:ला यासाठी पूर्णत: मुक्त ठेऊ इच्छितो. एवढ्या मोठ्या खर्चिक शैक्षणिक योजनेचे ओझे राज्याला पेलता येईल की नाही हे निश्चितपणे समजल्याशिवाय मी कोणतेही धोरण निश्चित करू शकत नाही. माझी महत्त्वाकांक्षा आणि माझ्या इच्छा साकार करण्यासाठी आणि माझे धोरण यशस्वी ठरण्यासाठी शिक्षण ही निखळ आवश्यक गोष्ट आहे. एक महत्त्वाचा मुद्दा आपण लक्षात ठेवायला हवा की, सुशिक्षित लोकांना एक बळकट आणि खंबीर सरकारची गरज असते. आपले वारस ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील, अशी मला आशा आहे. आपल्या संस्थानांतील सरकारे सध्या अतिशय दुर्बल आणि असमाधानकारक आहेत असे असण्याचे कारण, ती स्थानिक प्रतिनिधींकडून चालवली जातात हे नसून ती हास्यास्पद, अस्पृहणीय आणि नियमबाह्य राजकीय परिस्थितीत आहेत.सक्तीच्या शिक्षण योजनेस मी मंजुरी देत आहे; परंतु अंमलबजावणी राज्याच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे.[४]

१६ मार्च १८९३रोजी महाराजांनी काढलेल्या वरील आदेशाकडे आपण बारकाईने पाहिल्यास असे लक्षात येईल की, सक्तीच्या शिक्षणाच्या त्यांच्या धोरणात, आर्थिक बाबीला त्यांनी जितके महत्त्व दिले होते जितकी त्यांना या योजनेसाठी लागणारा प्रचंड खर्च कशा पद्धतीने उभा करायचा याची चिंता होती तितकीच 'पडदा पद्धतीमुळे' मुलींच्या शिक्षणात अडसर निर्माण होऊ नये याची देखील चिंता होती. सक्तीच्या शिक्षणाची सुरुवात करताना अगदी मूलभूत स्वरूपाच्या त्यांच्या आदेशामध्ये महाराजांनी आवर्जून मुलींच्या शिक्षणाबाबत विचार करावा ही गोष्ट महाराजांची

स्त्रीशिक्षणविषयक दृष्टी आणि तळमळ अधोरेखित करणारी आहे. सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याआड जर पडदा पद्धती येत असेल तर तेथे काहीतरी अन्य मार्ग काढायला परवानगी देण्याची मात्र काहीही झाले तरी स्त्रियांच्या शिक्षणाबाबत तडजोड न करण्याची महाराजांची ठाम भूमिका होती म्हणूनच सदर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा स्त्रियांच्या शिक्षणाच्या दृष्टीने एक क्रांतिकारी पाऊल होते. या क्रांतिकारी निर्णयाबद्दल महाराजांना बराच विरोध सहन करावा लागला. पण तरीही त्यांनी न डगमगता, स्त्रियांना शैक्षणिक प्रवाहात सामावून घेतले.

महाराज आपल्य एका भाषणात म्हणतात की, ''सक्तीच्या शिक्षणाचे धोरण मी दाखल केले आहे, ते यशस्वी होण्यासाठी व त्या प्रित्यर्थ जो खर्च करण्याचे मी धारिले आहे त्याचा मोबदला मला दुसऱ्या कोणत्याही कामात मिळाला नाही तरी चालेल; परंतु या खर्चाचा मोबदला मला पूर्ण मिळण्यासाठी प्रजेने मदत केली पाहिजे. ती मदत अशी की, प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुला-मुलींना गरज पडल्याप्रमाणे फक्त तिसऱ्या इयत्तेपर्यंतच न शिकविता निदान पाचव्या इयत्तेपर्यंत त्यांचा अभ्यास करावा. जर याप्रमाणे झाले तर मला माझ्या मेहनतीचे फळ मिळाले. नाही तर ते व्यर्थ जाण्याचा संभव आहे. तरी माझ्या हायातीत किंवा पश्चात हे महान कार्य सुधारून घेण्याचे प्रजेच्याच स्वाधीन आहे.''[५] महाराजांचा मुलींच्या शिक्षणावर विशेष कटाक्ष होता. त्यामुळे ते मुलींना उद्देशून सांगतात की, ''मुलींनीदेखील तितकाच अभ्यास करणे जरूर आहे. सांसारिक रितीरिवाजामुळे, वाटेल त्या अडचणी येत असल्या तरी त्या दूर करून प्रत्येक मुलीकडून निदान पाचव्या इयत्तेपर्यंत अभ्यास पुरा करविण्याची तुम्ही जाहीर हिंमत दाखवा.''[६] मुलींना खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या प्रवाहात आणणारा हा सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने वरदानच ठरला. तत्कालीन समाजाची मानसिकता पाहता लोक स्वत:हून मुलींच्या शिक्षणासाठी तयार होतील ही आशा महाराजांना वाटत नव्हती. त्यामुळेच सामाजिक बदलासाठी प्रसंगी कायद्याचा आधार घेण्याची भूमिका महाराजांनी शिक्षणाच्या सक्तीच्या कायद्यासाठी घेतली. हा कायदा स्त्रियांच्या शिक्षणासाठी का महत्त्वाचा होता हे आपणास त्यांची काही ठळक वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर लक्षात येईल.

१. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात सन १८९३मध्ये अमरेली प्रांतात झाली असली तरी १९०६ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार हा कायदा संपूर्ण बडोदा राज्याला लागू करण्यात आला होता. कलम २ नुसार काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये महाराज एखाद्यसा विभागाला किंवा समुदायाला या कायद्यातून सूट देऊ शकतील अशी तरतूद करण्यात आली होती.

२. कलम ४नुसार या कायद्याअंतर्गत मुलामुलींची वयोमर्यादा सात ते बारा वर्षे अशी ठेवण्यात आली होती.

३. कलम ५नुसार कायद्याने निर्धारित केलेल्या वयातील मुलामुलींना शाळेत पाठविण्याचे बंधन पालकांवर होते.

४. पुढील काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये मुलामुलींना शाळेत गैरहजर राहण्याची परवानगी देण्यात आलेली होती.

अ .मुलामुलींना काही कायमस्वरूपीचे शारीरिक किंवा मानसिक अपंगत्व असेल तर.

ब. मुलांचे पालक वृद्ध असतील किंवा काही गंभीर स्वरूपाच्या आजाराने पिडीत असतील आणि मुलांनी त्यांची काळजी घेण्यासाठी घरी राहणे आवश्यक असेल तर.

क.ज्या मुलामुलींचे आईवडील दोघेही उदरनिर्वाहासाठी कामावर जात असतील व घरात लहान भावंडांची काळजी घेण्यासाठी मुला-मुलींना घरात राहणे आवश्यक असेल तर.

घ. शाळा घरापासून एक कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल किंवा गावाच्या आसपास शाळाच नसेल तर.

ड.मुले घरी राहून अभ्यासात समाधानकारक प्रगती करू शकत असतील तर.

५.वार्षिक परीक्षेच्या एक महिना अगोदर गावातील महसूल अधिकारी, शिक्षकांच्या मदतीने शाळायोग्य वयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची खानेसुमारी करत असत आणि ती यादी प्रसिद्ध केली जात असे.

६.यादी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पालक आपल्या हरकती किंवा सूट मिळविण्यासाठीचे अर्ज दाखवल करू शकत.

७.ज्या पालकांच्या मुलांची नावे यादीत आहेत व ज्यांना कोणतीही सूट मिळालेली नाही त्याना आपली मुले यादी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत शाळेत पाठविणे बंधनकारक असे.

८.यादीत नाव असूनही शाळेत दाखल न झालेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल, मुख्याध्यापकांनी दर महिन्याला सरकारला सादर करणे बंधनकारक असे.

९.मुलामुलींना शाळेत न पाठविणाऱ्या अशा पालकांना नोटीस पाठविली जात असे.

१०.अशा पालकांना सुनावणीसाठी हजर राहावे लागत असे व दोषी आढळल्यास त्यांना दंड केला जात असे. पहिल्या गुन्ह्यासाठी आठ आणे, दुसऱ्यांदा गुन्हा घडल्यास एक रुपया आणि त्यानंतरच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी आधीच्या दंडाच्या रकमेत दोन आणे अधिकचे जोडून दंड आकारण्यात येई. दंडाची जास्तीत जास्त रक्कम दहा रुपयांपर्यंत घेण्याची तरतूद या कायद्याने केलेली होती.

११.सदर दंडाची रक्कम पालकांनी १५दिवसांच्या आत भरणे अनिवार्य होते. अन्यथा ती रक्कम संबंधितांच्या महसुलातून वसूल केली जात असे.

१२.सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या वयातील विद्यार्थ्यांना कामावर ठेवणाऱ्या मालकांवर सुद्धा गुन्हा दाखल करण्याची तरतूद या कायद्यात होती.

१३.जमा झालेल्या दंडाची रक्कम ही फक्त शिक्षणासाठी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली होती. त्यापैकी ६५% रक्कम इमारत बांधकामासाठी, ३५% रक्कम पुस्तके व गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी वापरण्यात येत असे.[७]

**सक्तीच्या प्राथमिक शिक्षणातील मुलींच्या संदर्भातील अडचणी**

**१. मुलींच्या नावनोंदणी संबंधीच्या अडचणी**

या कायद्यानुसार शालेय वयातील अर्थात सात ते बारा या वयोगटातील मुलींची खानेसुमारी करणे व सरकार दप्तरी नोंद करवून घेणे अत्यंत आवश्यक बाब होती. शाळेतील शिक्षकांनी गावातील पटेल या अधिकाऱ्यांच्या मदतीने अशी खानेसुमारी करण्याचे काम सोपविलेले होते. मात्र बऱ्याचदा शिक्षकांपेक्षा हुद्याने मोठे असणाऱ्या पटेल या अधिकाऱ्याकडून खानेसुमारीचे काम करवून घेणे शिक्षकांना शक्य होत नसे. ज्यावेळी ही गोष्ट महाराजांच्या लक्षात आली तेव्हा त्यांनी खानेसुमारीचे काम शिक्षकांऐवजी पटेलांकडे सोपविले व शिक्षकांनी पटेलांना मदत करावी असे आदेश दिले. त्यामुळे खानेसुमारीत वाढ झाली. मात्र त्यात मुलींची माहिती मिळविणे हे अतिशय अवघड काम असे. मुलींना शाळेत पाठविण्याबाबत अजूनही पालकांचा तीव्र विरोध होता. मुलींना शाळेत पाठविण्यापेक्षा आपल्याला रोजगारात त्यांचा हातभार लागावा किंवा घरात राहून मुलींनी आपल्या लहान भावंडांना सांभाळण्यासाठी मदत करावी या हेतूने पालक आपल्या मुलींची नोंदणी करणे टाळत असत. गावातील आपले हितसंबंध सांभाळण्यासाठी बऱ्याचदा नोंदणी अधिकारी सुद्धा मुलींच्या नोंदणीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असत. गावपातळीवर नोंदणीमुळे आपापसात संघर्ष होऊ नये या हेतूने मुलींची नोंदणी टाळली जात असे.

**२. पडदा पद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी**

राजपूत आणि मुस्लिम अशा जाती समुदायांमध्ये पडदापद्धती कटाक्षाने पाळली जात असे. अशा पडदा पद्धती पाळल्या जाणाऱ्या समाजामध्ये मुलींना शाळेत पाठवायला लागू नये यासाठी मुलींची माहिती खानेसुमारी करणाऱ्या अधिकाऱ्यांना न देण्याचा मार्ग अवलंबिला जात असे. मुलींची माहिती लपविल्यामुळे बऱ्याचदा शाळेत जाणाऱ्या मुलींच्या संख्येवर परिणाम झालेला दिसत असे. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या चाणाक्ष नजरेतून ही गोष्ट सुटणे शक्यच नव्हते. त्यामुळे त्यांनी पुढे पडदा पद्धती संपविण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**३. कायद्यातून मुलींना सूट मागण्याचे जास्तीचे प्रमाण**

काही अपरिहार्य आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये या कायद्यातून सूट मिळविण्यासाठी अर्ज करता येण्याची तरतूद करण्यात आलेली होती. मुलींना शिक्षणातून सूट मिळावी व तिला शाळेत पाठवावे लागू नये म्हणून धूर्त पालक अशा या अपवादात्मक तरतुदींचा गैरफायदा घेऊन मुलींना सूट मिळविण्यासाठी अर्ज करत असत. या कायद्यातून सूट मिळविण्यासाठी येणाऱ्या अर्जांच्या संख्येत मुलींना सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यातून सूट मिळावी म्हणून येणाऱ्या अर्जांची संख्या, मुलांच्या तुलनेत दुप्पट असे. महाराजांनी या बाबतीत स्वत: लक्ष घालून याबाबत कायदेशीर कारवाईचे आदेश अधिकाऱ्यांना दिले होते. त्यावरून त्यांची स्त्री शिक्षणाची तळमळ दिसून येते.[९]

आपण हाती घेतलेल्या शिक्षणाच्या कार्याला लोकांकडून जेव्हा विरोध होत असे तेव्हा महाराज मनातून अत्यंत व्यथित होत असत. दिवाण साहेबांना लिहिलेल्या एका पत्रात महाराज या विषयीची चिंता प्रकट करताना दिसतात. "When I was last touring in the district, cultivators of various villages complained to me against the existence of primary schools, especially in the case of girls; they wanted the girls freed from attending, and when girls did attained, proper advantage was not being taken of the schools. It is necessary to see how far we should proceed with enforcement of compulsory education for girls

in all places. In any event , we spent such large sums on education that we must see that schools are really effective in carrying out our purpose. Otherwise ineffective schools should be closed."[10]

अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड देत त्यातून यशस्वीपणे मार्गक्रमण करत महाराजांनी स्त्री शिक्षणाचे आपले कार्य अखंडीतपणे सुरूच ठेवले. त्याचाच परिणाम म्हणजे बडोदा राज्यात स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण तत्कालीन कालखंडातील इतर संस्थानिक राज्यांच्या तुलनेत जास्त होते.[११]

| **राज्य** | **विद्यार्थ्यांची संख्या प्रा.शा. १९३७-३८** | | **शाळेतील १०० मुलांच्या मागे मुलींच्या संख्येचे प्रमाण %** |
|---|---|---|---|
| | **मुले** | **मुली** | |
| बडोदा | १४७,९९१ | १०६,५२७ | ६१.२% |
| मद्रास | १९९३,४१० | ८८१५४९ | ४४.३ % |
| बंगाल | १९,०५,१२६ | ६८५४२६ | ३५.९% |
| सिंध | ११९,६११ | ४२,३०६ | ३५.०% |
| मुंबई | ८८७३५९ | ३०४१५० | ३४.३% |
| ओरिसा | २३२३६८ | ५७८०१ | २५.०% |
| पंजाब | ७८७४९४ | १७००५२ | २३.०% |
| सेंट्रल प्रोव्हिजन | ३५६०५५ | ७९७३१ | २२.५% |
| युनायटेड प्रोव्हिजन | ११९३७६० | २०४७०९ | १७.२% |
| बिहार | ७०६९८३ | १०७२१५ | १५.१% |
| N.W.E. | ५९८६४ | ७००१ | ११.६% |

वरील आकडेवारीनुसार सन १९३७-३८या वर्षापर्यंत स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत बडोदा राज्य प्रथम क्रमांकावर होते. यामागे महाराजांची स्त्रीशिक्षणाची तळमळ व दूरदृष्टी हेच कारण होते.

**बडोदा राज्यातील सन १९१५-१६ मधील प्राथमिक शाळा आणि विद्यार्थिनींची संख्या**

| अ .क्र | शाळा | बडोदा शहर | | बडोदा विभाग | | कडी विभाग | | नवसारी विभाग | | अमरेली विभाग | | एकूण शाळा | एकूण विद्यार्थिनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळा | शाळा | विद्यार्थिनी | शाळा | विद्यार्थिनी | hशाळा | विद्यार्थिनी | शाळा | विद्यार्थिनी | शाळा | विद्यार्थिनी | शाळा | वि. |
| १ | गुजराती मुलींच्या शाळा | ११ | २३३३ | ९१ | ९४०९ | १३१ | १५८५९ | ३२ | २८७२ | ४४ | ४५२० | ३०९ | ३५००२ |
| २ | मराठी मुलींच्या शाळा | ०७ | १२५४ | -- | -- | -- | -- | ०१ | ४६ | ०१ | ६४ | ०९ | १३६४ |
| ३ | उर्दू मुलींच्या शाळा | ०५ | ५८४ | ०६ | ५२९ | १३ | ९६० | ०५ | ३८९ | ०४ | ५२२ | 33 | २९८४ |
| ४ | अंत्यज मुलींच्या शाळा | ०१ | १०८ | -- | -- | ०४ | २४४ | -- | -- | -- | -- | ०५ | ३५४ |
| ५ | जनाना क्लासेस | ०१ | ८९ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ८९ |
| | | २५ | ४३६८ | ९७ | ९९३८ | १४८ | १७०६३ | ३८ | ३३०७ | ४९ | ५१०६ | ३५७ | ३९९७१ |

प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सर्वाधिक पसंती मातृभाषेला अर्थात गुजराती माध्यमांच्या शाळांना असल्याचे दिसून येते. सर्वाधिक ३०९मुलींच्या शाळा व त्यातून शिक्षण घेणाऱ्या ३५००२ इतकी मुलींची संख्या गुजराती शाळांमध्ये होती. त्या खालोखाल उर्दू माध्यमातील शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या होती. एकूण ३३उर्दू मुलींच्या शाळा व त्यात शिक्षण घेणाऱ्या एकूण २९८४मुली होत्या. मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळा तिसऱ्या क्रमांकावर होत्या. त्यामध्ये एकूण ९शाळांमधून १३६४मुली शिक्षण घेत होत्या. अंत्यज अर्थात अस्पृश्य मुलींसाठीच्या शाळा फक्त बडोदा शहर आणि कडी प्रांतात होत्या. एकूण ५शाळांमधून, ३५२ विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. जनाना शाळा, अर्थात पडदानशीन स्त्रियांसाठी सन १९१५-१६ मध्ये बडोदा शहरात फक्त एक शाळा होती व त्यामध्ये एकूण ८९मुली शिक्षण घेत होत्या.[१२]

**बडोद्यातील शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या सन १९३४-३५**
**इंग्रजी शिक्षण विभाग**

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | संस्था/ शाळा | शाळांची संख्या | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | सरकारी शाळा | | | | | |
| १ | | कॉलेज | ०१ | १,०४९ | ४८ | १०९७ |
| २ | | मुलांच्या मा.शा. | १४ | ५,५७७ | २३६ | ५८१३ |
| ३ | | मुलींच्या मा.शा. | ०१ | .... | ९५४ | ९५४ |
| ४ | | ए.व्ही. स्कूल | १५ | २९२८ | ४२ | २९७० |
| ५ | | मिडल स्कूल | ०७ | ५२२ | ०२ | ५२४ |
| ६ | | संमिश्र शाळा | ०७ | ४९२ | ४० | ५३२ |
| ७ | | क्लासेस | ०५ | २०२ | ०८ | २१० |
| ब | अनुदानित शाळा | | | | | |
| ८ | | माध्य. शाळा | १० | ३,९२८ | १०९ | ४,०३७ |
| ९ | | ए.व्ही.स्कूल | ०५ | ७०० | १३ | ७१३ |
| १० | | क्लासेस | ०५ | ७८ | ..... | ७८ |
| क | वना अनुदानित शाळा | | | | | |
| ११ | | माध्य.शाळा | ०१ | २८० | १४ | २९४ |
| १२ | | ए.व्ही. स्कूल | २६ | १,६६२ | २१ | १,६८३ |
| १३ | | क्लासेस | ११ | १८७ | ..... | १८७ |
| | | एकूण | १०८ | १७,६०५ | १४८७ | १९,०९२ |

**व्हर्नाक्युलर शिक्षण विभाग**

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | संस्था/ शाळा | शाळांची संख्या | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | **सरकारी शाळा** | | | | | |
| १४ | | पुरुषासाठी ट्रेनिंग स्कूल | ०१ | ४५० | .... | ४५० |
| १५ | | स्त्रियांसाठी ट्रेनिंग स्कूल | ०१ | ..... | १९९ | १९९ |
| १६ | | मुलांच्या प्रा.शा. | १९९७ | १४१४४४ | ५७४८९ | १९८९३३ |
| १७ | | मुलींच्या प्रा.शा. | २८७ | ३१ | ३८४४४ | ३८४७५ |
| १८ | | कलाभवन | ०१ | ५९४ | .... | ५९४ |
| १९ | | औद्योगिक शाळा | ०४ | १०१९ | .... | १०१९ |
| २० | | संस्कृत शाळा | ०६ | ३६५ | .... | ३६५ |
| २१ | | संगीत शाळा | ०५ | ३९३ | १५ | ४०८ |
| २२ | | अपंग शाळा | ०२ | ८२ | ०८ | ९० |
| २३ | | वसतिगृह आणि अनाथालये | १३ | ..... | ..... | ..... |
| ब | **अनुदानित शाळा** | | | | | |
| २४ | | मुला-मुलींच्या प्रा. व मा. शाळा | ४२ | १९५० | १०८४ | ३०३४ |
| क | **विनाआनुदानीतशाळा** | | | | | |
| २५ | | मुला-मुलींच्या प्रा.व मा. शाळा | ७४ | २०८६ | १७०१ | ३७८९ |
| २६ | | फंड स्कूल | ०३ | २२३ | १०९ | ३३२ |
| | | एकूण | २४३६ | १४८६३७ | ९९०४९ | २४७६८६ |
| | | ग्रँड टोटल | २५४४ | १६६२४२ | ९९०४९ | २४७६८६ |

(Report on public Instruction in the Baroda State for the year 1934-35)

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सक्तीच्या प्राथमिक धोरणाचे पडसाद बडोदा राज्याच्या शिक्षण क्षेत्रावर लवकरच फार चांगल्या रीतीने पडले. प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले . मुलींच्या शिक्षणा बाबत समाजात सकारात्मक परिवर्तन होऊन त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण देखीळल वाढू लागले. सक्तीच्या शिक्षणाचा जसजसा प्रसार होऊ लागला तसतसे बडोद्यातील प्राथमिक शाळांची संख्या आणि त्यातून शिक्षण घेणाऱ्या मुलामिलींची संख्या देखील

वाढत गेली.[१३] गेल्या दशकामध्ये साक्षरतेचे प्रमाण ५९% वाढले आहे. एकूण ४,३७,७३४सुशिक्षितांपैकी ३,५५,०६७पुरुष आहेत तर ७९,६६७स्त्रिया आहेत. मागील दशकाच्या तुलनेत स्त्रियांच्या शिक्षणाचे हे प्रमाण ९३% आहे. यावरून या काळात स्त्री शिक्षणात प्रगती होत असल्याचे आपणास दिसून येते.[१४]

तत्कालीन कालखंडातील इतर संस्थानिक राज्यांच्या तुलनेत बडोदा राज्याच्या स्त्री साक्षरतेचे प्रमाण नक्कीच जास्त होते. याचे संपूर्ण श्रेय महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला जाते . एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पाहता ही गोष्ट अधिक स्पष्टपणे लक्षात येईल.

| वर्ष | १९३४ | १९३५ |
|---|---|---|
| एकूण पुरुष लोकसंख्येच्या तुलनेत शाळेत जाणाऱ्या मुलांची (१३वर्षापर्यंत) | १००% | १००% |
| एकूण महिला लोकसंख्येपैकी शाळेत जाणाऱ्या १२ वर्षापर्यंतच्या मुलींची टक्केवारी | ७४% | ६८.८% |
| एकूण पुरुष लोकसंख्येच्या तुलनेत एकूण शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या | १३.२% | १३.२% |
| एकूण महिला लोकसंख्येच्या तुलनेत एकूण शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या | ८.४% | ८.३% |
| एकूण लोकसंख्येच्या तुलनेत शाळेत जाणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या | १०.९% | १०.८% |

**समारोप :**सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या धोरणामुळे बडोदा राज्यात खेड्यापाड्यातून शाळा सुरु होऊ लागल्या . आपल्या गावात शाळा सुरु झाली म्हणून मुलीआ शाळेत पाठवणे पालकांना सहजशक्य होऊ लागले. सुरुवातीच्या काळात मुलींच्या शिक्षणाला असलेला पालकांचा विरोध देखील हळूहळू कमी होऊ लागला त्यामुळे स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत झाली .बडोदा राज्यात मुलामुलींच्या सहशिक्षणाला क्वचित विरोध दिसून येत होता ही गोष्ट फार आश्चर्यकारक आहे. एकूण २२२६ प्राथमिक शाळांपैकी फक्त २७८शाळा या मुलींच्या शाळा होत्या. प्राथमिक शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या एकूण १०६३०२ मुलींपैकी ४०,३३२ मुली, मुलींच्या शाळांमधून शिक्षण घेत होत्या तर उरलेल्या ६५,९७० मुली या सहशिक्षण देणाऱ्या शाळांमधून मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेत होत्या. मुलांच्या शाळेतून सहशिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वर्षामागून वर्षाने झपाट्याने वाढत होती. म्हणूनच असे दिसून येते की, जरी काही पालकांच्या मुलींच्या शिक्षणाला विरोध होता तरी, एकदा मुलीला शाळेत घालण्याचे ठरविल्यानंतर पालक सहशिक्षणाला विरोध करीत नसत.[१५]सन १९१५-१६ च्या अहवालानुसार २०,२९,३२० या एकूण लोकसंख्येपैकी १७,७८,५८४लोकसंख्येला प्राथमिक शिक्षणासाठी शाळा उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात शाळेत जाणाऱ्या मुलामुलींची टक्केवारी १३.४% इतकी होती.[१६]

**संदर्भ**

१.दाते यशवंत, श्रीमंत सयाजीराव महाराज चरित्र, पृ. २२४
२.हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. ८१
३.मराठी विश्वकोश, भारत सरकार
४.महाराज सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह, खंड - ३, भाग - १, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७, पृ. २२३-२२४
५.भांड बाबा, महाराज सयाजीराव, गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, महाराजा सयाजीराव चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद, २०१७, पृ. ८३
६.उपरोक्त
७.Naik J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
८.Naik J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
९.Naik J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
१०.Maharaja Sayajirao Gaikwad, selected letters,vol.11,part4,p.53
११.Nail J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
१२.Nail J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
१३.Nail J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
१४.Nail J.P. Compulsory Primary Education in Baroda State, Retrospect and Prospect , 1941, P.13
१५. Report on public Instruction in the Baroda State for the year 1934-35
१६. Report on public Instruction in the Baroda State for the year 1934-35 p. 7